नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. ३**

**जून २०१०**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा गुरुवार,दि.१७ जून २०१० रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**स्थायी समितीचे ठराव**

**विषय क्र. ९१**

संदर्भ :– १) मा.आबा बागुल, मा.सुनिल कांबळे, मा.वसंत मोरे, मा.विजय मारटकर, मा.राजेंद्र काची, मा.महादेव बाबर, मा.दिलिप उंबरकर, मा.संदिप लडकत, मा.अरुण धिमधिमे, मा.सौ. अलका खाडे, मा.बापूसाहेब पठारे,अध्यक्ष,स्थायी समिती, मा.दिपक मानकर, मा.सौ. कमल व्यवहारे, मा.सुनिल बनकर व मा.शंकर बेलदरेपाटील यांचे दि.२८/२/२००८चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १९४२, दि. २८/२/२००८.

३) मनपा ठराव क्रं. ५७,दि.२१/५/२००८.

४) मनपा ठराव क्रं. ३०८, दि.२१/११/२००८.

५) मनपा ठराव क्रं. २६४, दि. २४/११/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

नव्याने होणाऱ्या एस.आर.अे. योजनेमध्ये पुणे मनपाचे नगरसेवकांचा त्या भागामध्ये होणाऱ्या पुर्नवसनामध्ये समावेश असावा, कारण योजना होत असताना झोपडपट्टी धारकांना दमदाटी केली जाते. त्यामुळे त्या– त्या भागातील नगरसेवकांचा समावेश असण्यास व एस.आर.अे. चा नकाशा मान्य करण्याचे अधिकार १९४९ च्या नियमानुसार महापालिकेला देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

सदर ठरावास मा.महा आयुक्त यांनी महाराष्ट्र शासनाची मान्यता घ्यावी.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. २, दि. २०/४/२०१० चा झाला आहे.)

Unregistered

**विषय क्रं. ९२**

संदर्भ :– १) मा.चौकशी अधिकारी यांचा खाचौ/एसआर/२६/०७,दि.१/११/२००७चा निष्कर्ष अहवाल.

२) कारणे दाखवा नोटीस जा. क्र. सहमआ/खाचौवि/१०१७, दि. १६/११/२००७.

३) कारणे दाखवा नोटीस जा. क्र. सहमआ/खाचौवि/७, दि. ३/४/२००८.

४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उका/खाचौवि/१२५,दि.२९/४/२००८ चे पत्र.

५) स्थायी समिती ठराव क्रं. २४८,दि.२७/५/२००८.

६) मनपा ठराव क्र. २६१, दि. २०/१०/२००८.

७) मनपा ठराव क्र. ३०, दि. २३/६/२००९.

८) मनपा ठराव क्र. २७५, दि. २४/११/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

श्री. भारत सदाशिव मोरे, नर्सिंग ऑर्डली, आरोग्य विभाग यांचे विरुध्दचे खातेनिहाय चौकशीप्रकरणी त्यांचे विरुध्द सिध्द होत असलेल्या आरोपाचे परिणामी कारणे दाखवा नोटीशीमध्ये प्रस्तावित केलेली शिक्षा कायम करुन त्यांना मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार मनपा सेवेतून काढून टाकण्यास (Removal from Municipal Service) व तशा आशयाचे आज्ञापत्र मा.अति.महा.आयुक्त(ज) यांच्या स्वाक्षरीने प्रसुत करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस

आहे.
(टिप :- सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १, दि. २०/४/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्रं. ९३**

संदर्भ :- १) मा.दिलिप उंबरकर, मा.राजेंद्र गोरडे, मा.शंकर केमसे, मा.सौ.सुरेखा पानसरे, मा.अशोक येनपुरे यांचे दि.१६/६/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठ.क्र.२८०,दि. १६/६/२००९.
३) मनपा ठराव क्र. १३४, दि. २७/१०/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

स्विकृत नगरसेवकांना संपूर्ण सभागृहाने निवडून दिले असल्याने त्यांनी त्यांचा विकासनिधी एकाच वॉर्डात खर्ची करणे अपेक्षित नाही. त्यामुळे त्यांनी त्यांच्या वॉर्ड विकासनिधीतून एका आर्थिक वर्षात चार कामे करण्यास व एका वॉर्डात फक्त र.रुपये ४ लाखपर्यंत खर्च करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.
(टिप :- सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. १७, दि. २०/५/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. ९४**

संदर्भ :- १) मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २४/८/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ६५२, दि. २४/८/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण (एस.आर.ए.) पुणे अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या गलिच्छ वस्ती घोषित झोपडपट्टीचे पुर्नवसन योजनेसाठी शासन निर्णय क्र. टीपीएस/१८०८/प्रक्र १२४२/०८/नवि-१३, नगरविकास विभाग-मुंबई यांचे दि. ११ डिसेंबर २००८ अन्वये जाहिर करण्यात आलेल्या झोपडपट्टीचे पुर्नवसन योजनेसाठी विशेष नियमावली तयार करण्यात आलेली आहे. सदर नियमावलीतील एस.आर.-९ अन्वये झोपडपट्टीचे पुर्नवसन योजना राबविताना जाहिर निविदा मागविण्याचे गरज नाही असा नियम मंजूर करण्यात आला आहे.

तथापि महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ६ मार्च २००८ आणि मा.सचिव, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचा शासन क्र. पीएमसी/२००५/२१९४/प्रक्र.१५७/०५/नवि-२२, दि. २१ फेब्रुवारी २००८ अन्वये व महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकती संदर्भात मे.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. १०२/२००१ दाखल करण्यात आलेली होती. त्या अन्वये मे.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेवून पुणे मनपाच्या मालकीच्या मिळकती वाटप नियमावलीस पुणे मनपाच्या मा.मुख्य सभेने व मा.स्थायी समितीची मान्यता घेवून पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली - २००८ तयार करण्यात येवून त्यास महाराष्ट्र शासनाची अंतिम मान्यता घेण्यात आलेली आहे. या नियमावलीतील भाग-९ मधील अ.क्र. (१५)(१६)(१७), भाग-१० मधील क्र. २३ तसेच भाग-१२ मधील क्र. २६ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतींचा विनियोग जाहिर निविदा मागवूनच करण्यात येईल असे स्पष्ट आदेश देण्यात आलेले आहेत.

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतींवर ज्या गलिच्छ वस्ती घोषित झोपडपट्ट्या आहेत त्या झोपडपट्टयांचे त्याच जागेवर झोपडपट्टी पुर्नवसन योजना (एस.आर.ए.) राबविण्यासाठी जाहिर निविदा मागवून जास्तीत जास्त प्रिमियम रक्कम अदा करण्याची तयारी दर्शविणाऱ्या व्यक्ती/संस्था/संघटनांची शिफारस करुन त्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.
(टिप :- सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ३९, दि. २४/५/२०१० चा झाला आहे.)

Unregistered

**विषय क्र. ९५**

संदर्भ :- १) गर्व्हमेंट ऑफ इंडिया यांचे सॉलिड वेस्ट (मॅनेजमेंट व हॅन्डलिंग) रुल्स २०००.
२) महाराष्ट्र नॉन बायोडीग्रेबल गार्बेज कंट्रोल ॲक्ट २००६.
३) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.घकव्या/१००१/प्रक्र/५४६ पापु-२२ दि.५ जानेवारी २००२.

४) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(घनकचरा व्यवस्थापन)/१३८५,दि.२५/३/२००८ चे पत्र.
५) स्थायी समिती ठराव क्र. ९००, दि. २/९/२००८.
६) मनपा ठराव क्र. ४०८, दि. २४/१२/२००८.
७) मनपा ठराव क्र. ५, दि. २०/५/२००९.
८) मनपा ठराव क्र. ११९, दि. २७/१०/२००९.
९) मनपा ठराव क्र. ५७१, दि. २३/२/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

मा.सुप्रिम कोर्ट यांच्या आदेशाप्रमाणे तसेच संदर्भांकित कायद्यान्वये निर्माण होणाऱ्या कचऱ्यांचे वर्गीकरण करणे आवश्यक असून कचऱ्याचे वर्गीकरण व विल्हेवाटीत कचरा गोळा करणाऱ्या अनेक संस्थांचा सहभाग महत्वाचा आहे. पुणे शहरात रोज सुमारे ३०० मे.टन इतका सुका कचरा कागद काच पत्र कष्टकरी पंचायत व इतर अनेक संघटनांच्या सुमारे ५००० पेक्षा जास्त सदस्यांमार्फत गोळा करुन पुर्नश्चक्रीकरणासाठी पाठविला जात आहे.

सबब पुणे शहरात घरोघरी वर्गीकरण केलेल्या कचऱ्याचे संकलन करणाऱ्या निवड केलेल्या सहकारी संस्थेमध्ये अशा प्रकारचे काम करणाऱ्या इतर संस्थांचा समावेश करणेबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात प्रस्तावित केलेल्या धोरणाच्या बाबीस मान्यता मिळणेस,

ब) १. पुणे शहराच्या विविध भागात घन कचरा विषयक कामकाज करणाऱ्या संस्था निवडणे

२. पुणे मनपाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीतून आवश्यकतेप्रमाणे निवड केलेल्या संस्थेला गणवेश, संरक्षक हातमोजे, विमा संरक्षण इ.आवश्यक अंदाजपत्रकामध्ये तरतूद करणे व त्यानुसार वरील साहित्य व सुविधा संस्थेला पुरविणे

३. निवड केलेल्या सहकारी संस्थेला सुरवातीच्या काळात अत्यावश्यक सेवकवर्गाचे मानधन, जनजागृती मोहिम व प्रशिक्षण इ.बाबीसाठी वा वेळोवेळी करण्यात येणाऱ्या बजेट तरतुदीप्रमाणे रक्कम अदा करणे

४. निवड केलेल्या सोसायटीचे कामकाज समाधानकारक नसल्यास या संस्थेला पुणे मनपातर्फे देण्यात येणारी मदत तात्काळ थांबविणे व पर्यायी व्यवस्था करणे व याबाबतचा निर्णय घेण्याचा व प्रसंगी उदभवणाऱ्या सर्व अडचणी प्रश्नांबाबत निर्णय घेणे

५. सदरच्या धोरणाप्रमाणे पुणे शहरात अंमलबजावणी करणे

वरील अनुक्रमांक अ ते ब मध्ये नमूद केलेल्या सर्व बाबीसंदर्भात निर्णय घेण्याचे व कार्यवाही करण्याचे महापालिका आयुक्त यांना अधिकार देणेस

क) सदरचा खर्च हा घनकचरा व्यवस्थापनाच्या योग्य त्या अर्थशिर्षकामधून करणेस.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४०, दि. २४/५/२०१० चा झाला आहे.)

Unregistered

**विषय क्र. ९६**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/भूसंपादन/४ दि. १/४/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. २०, दि. ६/४/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे पेठ बिबवेवाडी स.नं. ६७०, ६७१ इंदिरानगर लोअर पोलिस चौकीच्या पिछाडीस असलेला हॉल लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर ५ वर्षे मुदतीकरिता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी ज्ञानसागर एज्युकेशन सोसायटी यांची निविदा सर्वात जास्त र.रुपये ९,०००/– मासिक या दराची असून मनपा अपेक्षित रकमेपेक्षा र.रुपये ३,४३५/– ने जास्त असल्याने त्यांना सदरचा हॉल ताबा दिनांकापासून ५ वर्षे मुदतीसाठी निविदा शर्ती अटीप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देण्यास तसेच हॉलचा ताबा देणेपूर्वी ६ महिन्यांचे मासिक भाडे अनामत म्हणून व ३ महिन्यांचे मासिक भाडे आगाऊ स्विकारणेस तसेच मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करुन देणेस, त्याकरिता त्यांचेशी जरुर तो करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ३१, दि. २४/५/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. ९७**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ(ज)/से/२५ दि. १७/४/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ९७, दि. ४/५/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढविणेबाबत मनपा सेवाविनियमातील प्रकरण १२ मधील सेवा विनियम क्र. १३४ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. जेणेकरुन पुणे महानगरपालिकेकडील महिला कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार प्रसृती रजा मान्य करणे शक्य होईल.

**मनपा सेवाविनियम क्र. १३४**

| प्रचलित विनियम | दुरुस्त विनियम |
|---|---|
| नोकरीत कायम असलेल्या स्त्री सेविकेस रजा देण्याचा (मान्य करण्याचा) अधिकार असलेल्या अधिकाऱ्यास अशा स्त्री सेविकेस बाळंतपणाची सरासरी पगारी रजा देता येईल. अशी रजा सुरुवातीपासून अखेरपर्यंत ३ महिन्यांच्या मुदतीहून अधिक नाही इतकी देता येईल.<br>नोकरीत हंगामी असलेल्या सेवेत असलेल्या स्त्री सेविकेससुध्दा तिची दोन वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतर अशी रजा देता येईल.<br>मात्र ज्या सेविकेची तीन अथवा तीनहून अधिक मुले हयात आहेत अशा स्त्री सेविकेस या नियमातील तरतुदीनुसार बाळंतपणासाठी रजा देता येणार नाही. | १) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम ७४ मधील तरतुदीनुसार राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजा १८० दिवसांपर्यंत वाढविण्यात यावी. या सुविधेचा लाभ फक्त दोन अपत्यांपुरताच मर्यादित राहील. प्रसूती रजा मंजूर करण्याचा इतर शर्ती पूर्वीप्रमाणे यापुढेही लागू राहतील.<br>२) या सुविधेचा लाभ मा.मुख्य सभेची मान्यता प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.<br>३) मनपा सेवा विनियम १३४ मधील या संबंधातील विद्यमान तरतुदी या शासन निर्णयातील तरतुदीपुरते सुधारण्यात आले असे समजण्यात यावे. उपरोक्त नियमामध्ये रितसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल. |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अरजा–१४०९/प्र.क्र.८/०९/सेवा–६ दि.२४/८/२००९ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४६५(१) अन्वये वरीलप्रमाणे मनपा सेवा विनियमातील केलेल्या दुरुस्तीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ९८**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/भूसंपादन/२ दि. १/४/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १०२, दि. ४/५/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे गुलटेकडी स.नं. ६९९, फा.प्लॉट नं. ४१६/१ येथील वाहनतळ ५ वर्षे मुदतीकरिता ठेका पध्दतीने चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी शारदा सर्व्हिसेस यांनी देऊ केलेली सर्वात जास्त मासिक र.रुपये २७,५५०/– (मनपा अपेक्षित रकमेपेक्षा र.रुपये ८,७५३/– ने जास्त) व प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ अशी असल्याने त्यांना ताबा दिनांकापासून ५ वर्षे मुदतीकरिता निविदा शर्ती अटीप्रमाणे सदरचे वाहनतळ चालविणेस देणेकरिता व त्याअनुषंगाने त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ९९**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उकाजा/२६ दि. १७/४/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १०४, दि. ४/५/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे मनपाच्या स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालय, कात्रज येथील प्रवेश शुल्क व बॅटरी ऑपरेटेड वाहन यांचे खालील नमूद केल्याप्रमाणे तिकीटांचे प्रचलित दर कायम ठेवण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

UnRegistered

| अ.क्र. | तिकीट दराचे शिर्षक | प्रचलित/विद्यमान दर | |
|---|---|---|---|
| प्रवेश शुल्क तिकीट दर | | | |
| १ | प्रौढांसाठी | रुपये १० | |
| २ | लहान मुलांसाठी (५ ते १२ वर्षे) | रुपये ०५ | |
| ३ | विदेशी नागरिक | रुपये २५ | |
| ४ | अंध व अपंगांसाठी | मोफत | |
| ५ | वन्यजीव सप्ताह (१ ते ७ ऑक्टोंबर दरम्यान) शालेय विद्यार्थ्यांसाठी | रुपये ०२ | |
| बॅटरी ऑपरेटेड वाहन तिकीट दर | | | |
| १ | प्रौढांसाठी | रुपये २० | |
| २ | लहान मुलांसाठी (५ ते १२ वर्षे) | रुपये १० | |
| ३ | अंध व अपंगांसाठी | मोफत | |
| कॅमेरा वापर करणेसाठी | | | |
| ४ | स्टिल कॅमेरा | --- | |
| ५ | व्हिडीओ कॅमेरा | --- | |

**विषय क्र. १००**

संदर्भ :- १) मा. स्थायी समिती ठराव क्र. १३०८ दि. १४/१२/२००७.
२) मा. स्थायी समिती ठराव क्र. १३०९ दि. १४/१२/२००७.
३) मा. स्थायी समिती ठराव क्र. ७१० दि. ३१/८/२००९.
४) मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. ३२१ दि. २३/१२/२००९.
५) मा. मुख्य अभियंता, म.रा.वि.कं.पुणे यांचे पत्र क्र. ९१२ दि. २/३/२०१०.
६) मा.नगर अभियंता यांचे पत्र क्र. नआ/५९ दि. १२/८/२००९.
७) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/जनेसशपुअ क्र.२/३५ दि. १९/४/२०१० चे पत्र.
८) स्थायी समिती ठराव क्रं. १०५, दि. ४/५/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील प्रकल्पाकरिताच वीज पुरवठा करणेकरिता काम सुरु असलेल्या ठिकाणी हडपसर स.नं. ८९पार्ट, स.नं. ९२ पार्ट येथे त्याच प्रकल्पामधील ५००० चौ.फुट जागा ३० वर्षे मुदतीकरीता नाममात्र र.रुपये १/- भाड्याने म.रा.वि.वि.कंपनी यांना भाडेपट्टा करारावर देणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. १०१**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/उपआ(ज)/१०१५,दि.२५/३/२०१० चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्र. ५ दि. ६/५/२०१०.
३) स्थायी समिती ठराव क्रं. १६९, दि. १३/५/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

सन २००९ – १० चे अंदाजपत्रकामध्ये सार्वजनिक संस्थांना मान्य केलेल्या संस्थांनी जरूर तो विहित नमुन्यामध्ये देणगीचा करारनामा लिहून दिल्यानंतर, तसेच खालील बाबींची पूर्तता झाल्यानंतर त्यांना रकमा आदा करणेस मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ) मा. महा.आयुक्त यांचे या विषयपत्रालगतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या संस्थांनी जरुर तो करारनामा लिहून दिल्यानंतर संस्थांच्या नावे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा संबंधित संस्थांना अदा करणेस.

ब) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबतचे परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे शासकीय अधिकारी यांची नेमणुक करणेस.

क) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर ती संस्था ज्या वॉर्डामध्ये येत असेल त्या वॉर्डाचे विद्यमान सभासद नेमणेस.

ड) मा.अति.महा.आयुक्त ( ज ) यांचे परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये एखाद्या संस्थेच्या

Unregistered

नावामध्ये चूक / बदल झाला असल्यास, त्यांच्या नाव व पत्ता दुरुस्ती / बदल करणेस.

**विषय क्र. १०२**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/उपआ(ज)/१०१६,दि.२५/३/२०१० चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्र. ६ दि. ६/५/२०१०.
३) मा.उप आयुक्त(ज) यांचे क्र. उआ(ज)/१५९ दि. ७/५/२०१० चे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्रं. १७०, दि. १३/५/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

सन २००९ – १० चे अंदाजपत्रकामध्ये सार्वजनिक संस्थांना मान्य केलेल्या संस्थांनी जरूर तो विहित नमुन्यामध्ये देणगीचा करारनामा लिहून दिल्यानंतर, तसेच खालील बाबींची पूर्तता झाल्यानंतर त्यांना रकमा आदा करणेस मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ) मा. महा.आयुक्त यांचे या विषयपत्रालगतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या संस्थांनी जरुर तो करारनामा लिहून दिल्यानंतर संस्थांच्या नावे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा संबंधित संस्थांना अदा करणेस.

ब) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबतचे परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे शासकीय अधिकारी यांची नेमणुक करणेस.

क) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर ती संस्था ज्या वॉर्डामध्ये येत असेल त्या वॉर्डाचे विद्यमान सभासद नेमणेस.

ड) मा.अति.महा.आयुक्त ( ज ) यांचे परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये एखाद्या संस्थेच्या नावामध्ये चूक / बदल झाला असल्यास, त्यांच्या नाव व पत्ता दुरुस्ती / बदल करणेस.

**विषय क्र. १०३**

संदर्भ :- १) बालगंधर्व रंगमंदिराचा मा.स्थायी समिती ठराव क्र. १२५४ दि. २९/८/२०००.
२) यशवंतराव चव्हाण नाटयगृहाचा मा.स्थायी समिती ठराव क्र. १२५७ दि. १/९/२०००.
३) बालगंधर्व रंगमंदिराचा मा.स्थायी समिती ठराव क्र. ५३ दि. १०/४/२००६.
४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्रं. मआ/विका क्र.१/६२ दि. ५/५/२०१० चे पत्र.
५) मा.ॲड्.निलेश निकम, सभागृह नेता व मा.गणेश बिडकर यांची दि. १९/५/२०१० ची उपसूचना.
६) स्थायी समिती ठराव क्रं. २०४, दि. १९/५/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

बालगंधर्व रंगमंदिर व यशवंतराव चव्हाण नाटयगृह येथे चॅरिटेबल ट्रस्ट वगळून अन्य खाजगी संस्थांना थिएटर व कलादालनाच्या भाडयात खालील तक्त्यानुसार भाडेवाढ करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| (बालगंधर्व रंगमंदिर व यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथील सध्याचे भाडे आकारणी दर) | | | (नविन सुचित भाडेवाढ दर) | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | कार्यक्रम | सध्याचे भाडे आकारणी पाच तास | नविन प्रस्तावीत भाडे (आडवार) तीन तास | नविन प्रस्तावीत भाडे (सुट्टीचे भाडे) तीन तास |
| १) | अन्य खाजगी संस्था (नाट्यसंस्था व्यतिरिक्त) ३ तासांसाठी | भाडे ६५००/-<br>द्वारपालन २०४/-<br>सेवाकर(१०.३%) ६९१/- | भाडे १००००/-<br>द्वारपालन २०४/-<br>सेवाकर(१०.३%)१०५१/- | भाडे १५०००/-<br>द्वारपालन २०४/-<br>सेवाकर(१०.३%)१५६६/- |
| | | एकूण ७,३९५/- | एकूण ११,२५५/- | एकूण १६,७७०/- |
| २) | कलादालन (बालगंधर्व रंगमंदिर) (१ दिवसासाठी) | र.रु. १२०० + सेवाकर | र.रु. १५०० + सेवाकर | र.रु. १५०० + सेवाकर |
| ३) | कलादालन (यशवंतराव चव्हाण नाट्यगृह) (१ दिवसासाठी) | र.रु. १००० + सेवाकर | र.रु. १५०० + सेवाकर | र.रु. १५०० + सेवाकर |

Unregistered

**विषय क्र. १०४**

संदर्भ :– १) मा. हनिफ अ. शेख व मा.विनोद चंदू ओरसे यांचे दि. १७/५/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. २१४, दि. २५/५/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

वॉर्ड क्रं.१९, पर्णकुटी मधील येरवडा स.नं. १० येथे नोंदणीकृत धम्म जागृतीसंघ १९७५ पासून कार्यरत असून युवक संघ व महिला संघाच्या माध्यमातून विविध धार्मिक, सामाजिक उपक्रम राबविले जातात. धम्म जागृती संघाच्या वतीने अंत्यविधीसाठी शववाहिनी खरेदी करण्यात आली आहे. परंतु शववाहिनी ठेवण्या करीता जागा आवश्यक आहे. तरी धम्म जागृतीसंघास शववाहिनी ठेवण्याकरीता वॉर्ड क्रं.१९, पर्णकुटी मधील शिवराज चौक, सुलभ शौचालया मागील पुणे मनपाची छोटी मोकळी जागा उपलब्ध करून देण्यास मान्यता द्यावी, अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. १०५**

संदर्भ :– १) स्थायी समिती ठराव क्र. ९०८ दि. ३/११/२००९
२) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उआविका क्र.४/७९ दि. १५/५/२०१० चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्रं. २२३, दि. २५/५/२०१०.

–––

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाकडील कॅन्टींन मक्ता ३ वर्षे कालावधीसाठी चालविण्यास देणे कामी फेरटेंडर मागविले असता आलेल्या ४ निविदांपैकी श्री.तुषार हरिश्चंद्र काची, २२३ मंगळवार पेठ, पुणे ११ यांनी सर्वाधिक दर देवू केलेला असल्याने त्यांना प्रथम वर्षी वार्षिक कॅन्टींन फी रुपये ४,८६,०००/– व पुढील प्रत्येक वर्षी त्यामध्ये १२% मक्ता फी वाढ करुन ताबा दिनांकापासून एकूण ३ वर्षांसाठी कॅन्टीन मक्ता देणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. १०६**

संदर्भ :– १) मा.ॲड्.निलेश निकम, सभागृह नेता, मा.हनिफ शेख, मा.गणेश बिडकर, मा.अशोक हरणावळ यांचे दि. २५/५/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. २४६, दि. २५/५/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

अंदाजपत्रकातील कामाचे स्वरूप न बदलता फक्त संबधित वॉर्डामध्ये असल्यास जागाबदला संबधी मा. नगरसेवकांचे पत्र घेवून वर्गीकरण न करता काम करण्याचे अधिकार मा. उप आयुक्त /खातेप्रमुख यांना देण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर सदर ठरावाची कार्यवाही मा. महापालिका आयुक्त यांनी करावी.

**विषय क्र. १०७**

संदर्भ :– १) मा. ॲड्. निलेश निकम, सभागृह नेता, मा.उज्ज्वल केसकर यांचे दि. २५/५/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. २४७, दि. २५/५/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहरातील नाटक कंपनी हया नाटय संस्थेची इटलीच्या रोसोबस्टार्डो लाईव्ह २०१० हया आंतरराष्ट्रीय महोत्सवासाठी निवड झालेली आहे. संपूर्ण जगभरातून १०० नाटकांची निवड झाली आहे. नाटक कंपनीच्या इटली दौऱ्याचे सहप्रायोजकत्व स्विकारून त्यांच्या दौऱ्यासाठी र.रू. २,९०,०००/– खर्च करण्यास मान्यता द्यावी, अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

सदरचा खर्च त्यांचे एक वेळेचे प्रवासासाठी देण्यात यावा. या संस्थेतील सर्व कलाकार विद्यार्थी आहेत.

## विधी समितीचे ठराव

**विषय क्र. १०८**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ /उआ/से/९८७, दि. १७/३/२०१० चे पत्र.

Unregistered

२) विधी समिती ठ.क्र. ९, दि. ६/५/२०१०.

– – –

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

श्री. डामसे लक्ष्मण रामभाऊ, उपायुक्त (गलिच्छ वस्ती निर्मुलन) (वे.श्रे.रू.१५६०० ते ३९१०० + ग्रेड पे +मान्य भत्ते) यांची प्रतिनियुक्तीने अहमदनगर महानगरपालिका येथे आयुक्त या पदावर नियुक्ती करण्यासाठी मनपा सेवाविनियम ४१ ( ब ) नुसार मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. १०९**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उआ/से/२७, दि. १७/४/२०१० चे पत्र.

२) विधी समिती ठ.क्र. १०, दि. ६/५/२०१०.

– – –

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील श्रीमती लोंढे पुष्पावती बाळासाहेब यांचा सरलेखनिक पदावरील दि.१३/१/२००६ हा व कार्यालय अधिक्षक पदावरील दि.१०/९/२००७ हा तसेच अधिक्षक पदावरील दि.१/१/२००९ हा, असे मानीव दिनांक धरून अधिक्षक पदावर बढती देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ११०**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे जा.क्र.मआ/उआ(ज)/से/२८,दि.१७/४/२०१०चे पत्र.

२) विधी समिती ठ.क्र. ११, दि. ६/५/२०१०.

– – –

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील लघुटंकलेखक (वर्ग – ३) (वेतनश्रेणी रू. ५२०० ते २०२०० + ग्रेड. पे. ४१०० + मान्य भत्ते ) या हुद्याची रिक्त पदे भरणेसाठी खालीलप्रमाणे तयार करणेत आलेल्या निवड / प्रतिक्षायादीस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार नेमणूक करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

लघुटंकलेखक (वर्ग – ३) या पदासाठी खालीलप्रमाणे तयार करण्यात आलेल्या निवड यादीवरील अ.क्र.१ येथील उमेदवार हजर झाल्यानंतर प्रतिक्षायादीवरील उमेदवाराचे नाव उपरोक्त प्रतिक्षायादीवर एक वर्षा पर्यंत राहतील.तद्नंतर ती व्यपगत होईल.

**निवडयादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा गट |
|---|---|---|
| १ | श्री. ढाकणे ज्ञानेश्वर शंकर | भजड |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा गट |
|---|---|---|
| १ | श्रीमती सारूक सुनिता मच्छिंद्र | भजड |

**विषय क्र. १११**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/उआ(ज)/से/२९,दि.१७/४/२०१०चे पत्र.

२) विधी समिती ठ.क्र. १२, दि. ६/५/२०१०.

– – –

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे महानगरपालिकेकडील सिनिअर ग्रेड लेखनिक – वर्ग ३ (माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग) (सुधारित वेतनश्रेणी ५२०० ते २०२०० + ग्रेड पे ४१०० + मान्य भत्ते) या पदासाठी खालीलप्रमाणे तयार केलेल्या निवडसूची/प्रतिक्षासूची प्रमाणे नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) अन्वये मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**सिनिअर ग्रेड लेखनिक (वर्ग –३) (माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग)**

**निवडसूची**

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा गट |
|---|---|---|

Unregistered

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. नाझीरकर गंगाराम नबाजी | भजक |
| २) | श्रीमती रावळ रंजना कृष्णाजी | सर्वसाधारण ( भजब ) |
| ३) | श्री.केदारी चंद्रकांत नामदेव | सर्वसाधारण ( इमाव ) |
| ४) | श्रीमती केळकर मृणाल राजेश | सर्वसाधारण |

**प्रतिक्षासूची**

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्री. कांबळे गोपाळ मानतप्पा | अजा |
| २) | श्री.हनवते सुनिल जगन्नाथ | सर्वसाधारण (अजा) |
| ३) | श्री.आदमाने महादेव दादु | सर्वसाधारण (अजा) |

**विषय क्र. ११२**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआ/से/३१, दि. १९/४/२०१० चे पत्र.
२) विधी समिती ठ.क्र. १३, दि. ६/५/२०१०.

– – –

मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

श्री. गालिंदे अंबरिष रतिकांत, सह महापालिका आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांचा विशेष कार्याधिकारी (गणक) या पदावरील खालील कालावधीतील ४ दिवसाचा खंड, कोणतेही आर्थिक लाभ न देता, केवळ पेन्शनसाठी क्षमापित करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | खाते | पद | सेवेचा कालावधी | एकूण सेवा | सेवाखंड |
|---|---|---|---|---|---|
| १) | मुख्य लेखापाल | विशेष कार्याधिकारी (गणक) | १२/४/९४ ते११/१०/९४ | ६ महिने | --- |
| २) | मुख्य लेखापाल | विशेष कार्याधिकारी (गणक) | १४/१०/९४ ते१३/४/९५ | ६ महिने | २ दिवस |
| ३) | मुख्य लेखापाल | विशेष कार्याधिकारी (गणक) | १५/४/९५ ते१४/१०/९५ | ६ महिने | १ दिवस |
| ४) | मुख्य लेखापाल | विशेष कार्याधिकारी (गणक) | १६/१०/९५ ते२१/१/९६ | ६ महिने | १ दिवस |

**शहर सुधारणा समितीचे ठराव**

**विषय क्र. ११३**

संदर्भ :– १) मा. उज्वल केसकर व मा. दत्तात्रय खाडे यांचे दि. १८/४/२००७ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १४, दि. ९/५/२००७.
३) मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र.मआ/नअ/१७७,दि.१३/६/२००७ ने पाठविलेला अभिप्राय.
४) मा. अविनाश जाधव, उपाध्यक्ष, शहर सुधारणा समिती व मा. भिमराव तापकिर यांची दि. ६/७/२००७ ची उपसूचना.
५) शहर सुधारणा समिती ठराव क्रं.१०७,दि.६/७/२००७.
६) मनपा ठराव क्र. २६०, दि. २६/११/२००७.
७) मनपा ठराव क्र. ४११, दि. २१/२/२००८.
८) मनपा ठराव क्र. ६०, दि. २१/५/२००८.
९) मनपा ठराव क्र. २२२, दि. २३/९/२००८.
१०) मनपा ठराव क्र.४१४, दि. २४/१२/२००८.
११) मनपा ठराव क्र. ३७, दि. २३/६/२००९.
१२) मनपा ठराव क्र.१४१, दि. २७/१०/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय अवलोकन केला.

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेनुसार –

मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय अंशत: मान्य करण्यात येत आहे. तसेच नियोजन प्राधिकारणाला राज्य सरकारच्या परवानगी R. P. मध्ये बदल करण्याचा अधिकार आहे. सबब पुणे मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या प्रारुप विकास आराखड्यामध्ये राज्य सरकारच्या परवानगीने D. P. शी सुसंगत R. P. मध्ये बदल करण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२१, दि. २०/५/२०१० चा झाला आहे.)

Unregistered

**विषय क्र. ११४**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/६६८, दि. २९/९/२००८ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २५४, दि. २४/२/२००९.
३) मनपा ठराव क्र.११३, दि. २७/१०/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

हडपसर औद्योगिक वसाहती लगत ते जुना कॅनाल एच.सी.एम.टी.आर.असा १२ मी. रूंदीचा जोड रस्ता व नविन कॅनाल वरील १२ मी.रूंदीच्या पुलाची आखणी मा. महा. आयुक्त यांचे पत्रासोबतच्या नकाशात **अ** व **ब** या अद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे २०५ अन्वये रस्ता आखण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२२, दि. २०/५/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. ११५**

संदर्भ :- १) नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील राजपत्र दि. १ जून २००६.
२) मा.अवर सचिव, त्यांचेकडील पत्र टी.पी.एस.१८०१/१४५/प्र.क्र.६९/०६/नवि १३, दि. २/२/२००७.
३) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.टी.पी.एस. १८०१/१४५/ नवि १३ दि. १८ मे २००६.
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/५७५, १/९/२००८ चे पत्र.
५) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २५५, दि. २४/२/२००९.
६) मनपा ठराव क्र.११४, दि. २७/१०/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

नगर रचना योजना येरवडा क्र. १ मधील अंतिम भूखंड क्र.३ ( पार्ट ) स. नं.१०२/अ/१ ब ही मिळकत ( क्षेत्र २०६०० चौ.मी.) हे शेती विभागामधून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट झाली असल्याने एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ९१ अन्वये शासनाची फेरबदल करण्याची कार्यवाही सुरू करण्यास व या कार्यवाहीचा भाग म्हणून दै. इंग्रजी व मराठी वृत्तपत्रात व शासकीय राजपत्रात जाहीर प्रकटन देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२३, दि. २०/५/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. ११६**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंट यांची दि.१६/०९/०८ ची ऑर्डर.
२) मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/११७९, दि. ९/१/२००९ चे पत्र.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३७, दि.२६/५/२००९.
४) मनपा ठराव क्र.१२९, दि. २७/१०/२००९.

– – –

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

सन १९८७ चे मान्य विकास योजना आराखड्यानुसार महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट यांचे ताब्यात काही मिळकती आहेत. या मिळकतींचा जास्तीत जास्त व्यापारी वापर करून महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट यांची आर्थिक स्थिती अधिक मजबूत करण्याचे, गृहखाते, महाराष्ट्र शासन यांनी ठराव क्र. STC ३४००/CR १४८/TRA- १ दि.०१/०२/२००१ अन्वये ठरविले.

याप्रमाणे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार सदर कॉर्पोरेशनचे ताब्यात असलेल्या मिळकतींवर अनुज्ञेय FSI चे ५०% FSI हा कमर्शिअल वापरासाठी अनुज्ञेय करावा असे Modification व मंजूरीचे प्रक्रिये दरम्यान उपरोक्त अधिनिमयाचे कलम १५४ अन्वये कार्यवाही करण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्य शासनाने दि.१७/१०/२००१ अन्वये दिलेले आहेत.

महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन यांनी त्यांचे ताब्यातील मिळकतींवर १.५ FSI अनुज्ञेय करून पैकी १.० FSI हा कमर्शियल वापरासाठी अनुज्ञेय करावा. यामुळे या मिळकतींचा जास्तीत जास्त वापर

Unregistered

ग्राह्य होऊन शासनाकडे पुरेपुर महसूल जमा होऊ शकेल ही मागणी दि.१७/०५/२००८ चे पत्रान्वये शासनाकडे केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाने सदर कॉर्पोरेशनची ही मागणी मान्य करून त्यानुसार मान्य विकास नियंत्रण नियमावलीत नव्याने Appendix एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ कलम ३७ (१) अन्वये सर्व Planning व Development Authorities ना डी.सी.रूल्समध्ये खालीलप्रमाणे बदल समावेश करण्याचे व त्यानुसार एम.आर.टी.पी. ॲक्ट १५४ अन्वये अंमलबजावणी करण्यास आदेश दिले आहेत.

<u>APPENDIX</u>

Commercial use of lands in the possession of the Maharashtra State Road Transport Corporation.

Notwithstanding anything to the contrary contained in these Regulations or the Development Plan / Planning, proposals land in the possession of the Maharashtra State Road Transport Corporation shall be allowed to be developed for additional 0.5 FSI over and above the permissible FSI. Out of total FSI maximum 1.00 FSI shall be allowed to be developed for commercial use and remaining FSI shall be for the self permissible use of the said Corporation as per the Development Plan, For additional 0.5 FSI, premium shall not be charged.

तरी मा.महा.आयुक्त यांच्या पत्राचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार बदल करणेस मान्यता द्यावी, मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२४, दि. २०/५/२०१० चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. ११७</u>**

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. टी.पी.एस.१८०८/७३५/प्र.क्र.१३६/०८/नवि/१३,दि. १८/८/०८.
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/१४०३, दि. १६/२/०९ चे पत्र.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ४०, दि.२६/५/२००९.
४) मनपा ठराव क्र.१३०, दि. २७/१०/२००९.

- - -

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका /नगरपालिका क्षेत्रातील शेती तथा ना विकास विभागामधील विशेष नगर वसाहतींसाठी ०.२ इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. प्रादेशिक योजना क्षेत्रातील शेती तथा ना विकास विभागातील विशेष नगर वसाहतीसाठी ०.५ इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.

विशेष नगर वसाहत प्रकल्पामध्ये विकसकास सर्व पायाभूत सुविधा व सार्वजनिक सुविधा निर्माण कराव्या लागतात. कमी चटई क्षेत्र निर्देशांकामुळे असे प्रकल्प आर्थिक दृष्टया सुसह्य होत नाहीत. अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकामधील या तफावतीमुळे प्रादेशिक योजना क्षेत्रामध्ये अशा प्रकल्पाचे प्रस्ताव करण्याकडे विकसकाचा कल दिसून येत आहे. त्यामानाने महानगरपालिका /नगरपालिका विशेष नियंत्रण प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये असे प्रकल्प करण्याचा कल कमी दिसून येत असल्याकारणाने अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशाकांमध्ये वाढ करणे आवश्यक असल्याचे मे.शासनाचे मत झाल्याने मे.शासनाने एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वये महापालिका /नगरपालिका क्षेत्रातील शेती तथा ना विकास विभागातील चटई क्षेत्राबाबत मंजूर विकास नियंत्रण नियमावली मध्ये पुढीलप्रमाणे फेर बदल करण्याचे निदेश दिलेले आहेत.

१) मंजूर विकास योजनेतील विशेष नगर वसाहतीसाठींच्या नियमामधील शेती तथा ना विकास किंवा तत्सम झोनमधील क्षेत्रासाठी अनुज्ञेय असलेला चटई क्षेत्र निर्देशांक आणि १.०० चटई क्षेत्र निर्देशांक यामधील फरकाएवढा अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक शासनाच्या पूर्व मंजूरीने अनुज्ञेय करता येईल अशा अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकासाठी शासनाच्या शिघ्र सिध्द गणका ( Ready Reckner ) मधील जमिनीचा दर किंवा र.रू.५००/- ( पाचशे ) प्रती चौ.फूट यापैकी जो दर जास्त असेल त्या दराने प्रिमियम आकारण्यात येईल.

२) विशेषनगर वसाहतीच्या नियमांमध्ये सवलत देण्याचे अधिकार शासनाला राहतील.

वरील प्रस्तावित फेर बदला विषयी जनतेकडून सुचना / हरकती मागविणारी नोटीस या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत प्रसिध्द करण्यात यावी व म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) मध्ये दिलेली सर्व वैधानिक कार्यवाही पार पाडून फेर बदल प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करावा असे निदेश आहेत.

तरी संदर्भाकिंत पत्राचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम

Unregistered

३७(१ ) नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.
(टिप :- सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२५, दि. २०/५/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. ११८**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/अतिमआ/उआ/से/४९६,दि.३/११/२००९ चे पत्र.
२) मा. पृथ्वीराज सुतार, मा. अरुण धिमधिमे व मा. रशिद शेख यांची दिनांक १३/१/२०१० ची उपसूचना.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २२९, दि. १०/२/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त (वि) यांची शिफारस व शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील असि.इलेक्ट्रिशियन वर्ग ३ ( वे.श्रे.रू.३५४०/- ते रू.८१३५/- + मान्य भत्ते ) या हुद्याचे २० रिक्त पदे भरणेसाठी खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादी व प्रतिक्षायादीस तसेच आरक्षण / अनुशेष व आस्थापनाविषयक बाबीचा विचार करून नेमणूका करणेस मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ मधील कलम ५३(१) नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

प्रतिक्षायादी ही निवडयादीवरील शेवटच्या उमेदवारांची नेमणूक झालेचे तारखेपासून ३ वर्षापर्यंत अस्तित्वात राहील. त्यानंतर प्रतिक्षायादी संपुष्टात आली आहे, असे समजण्यात येईल.

**निवडयादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | भरतीचा गट |
|---|---|---|
| १ | श्री.भंडारे अमोल दिगंबर | अनुसूचित जाती |
| २ | श्री.देशमुख सुभाष गणपत | अनुसूचित जमाती |
| ३ | श्री.धराडे सुभाष माधवराव | अनुसूचित जमाती |
| ४ | श्री.तळपे अनिल देवराम | अनुसूचित जमाती |
| ५ | श्री.जाधव संजय उमाजी | विमुक्त जाती (अ) |
| ६ | श्री.राहींज संतोष सुर्यकांत | भटक्या जमाती (क) |
| ७ | श्री.गंगावणे प्रमोद बबनराव | भटक्या जमाती ( ड ) |
| ८ | श्री.पोरे मनोज बाबुराव | इ.मा.व. |
| ९ | श्री.कुंभार आनंद शंकर | इ.मा.व. |
| १० | श्री.शिंदे जगमोहन नारायण | खूला |
| ११ | श्री.कुलकर्णी अमित अरूण | खूला |
| १२ | श्री.बहिरट स्वप्नील सुर्यकांत | खूला |
| १३ | श्री.बिरामणे विनोद हनुमंत | खूला |
| १४ | श्री. पवार अमित शिवाजी | खूला |
| १५ | श्री.नाईक अनिल बंजरंग | खूला |
| १६ | श्री. जगताप राहुल संभाजी | खूला |
| १७ | श्री.पाटील शिवाजी भाऊ | खूला |
| १८ | श्री.पारिटे संजय रामचंद्र | खूला |
| १९ | श्री.गोराडे रामकृष्ण दत्तात्रय | खूला |
| २० | श्री.मुजावर वसिम मुन्वर | खूला |
| २१ | श्री.मोकाशी निशिकांत राम | खूला |
| २२ | श्री.नागलकर प्रशांत मोहन | खूला |

**प्रतिक्षायादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | भरतीचा गट |
|---|---|---|
| १ | श्री. थोरात अंबादास विनायक | अनुसूचित जाती |
| २ | श्री.पाटोळे सुनिल विजय | अनुसूचित जाती |
| ३ | श्री.हुगे योगेश किरण | भटक्या जमाती ( क ) |

Unregistered

| | | |
|---|---|---|
| ४ | श्री. दाने दिपक अर्जुन | भटक्या जमाती ( क ) |
| ५ | श्री. फुंदे सचिन जलिंद्रनाथ | भटक्या जमाती ( ड ) |
| ६ | श्री. नाईक गिरीष श्रीराम | इ.मा.व. |
| ७ | श्री. बाणेकर नंदकुमार दशरथ | इ.मा.व. |
| ८ | श्री. रासकर सुनिल शिवाजी | इ.मा.व. |
| ९ | श्री.शेख शौकत हुसेन | इ.मा.व. |
| १० | श्री.पडळघरे अनिल कोंडीबा | खूला |
| ११ | श्री.द्विवेदी शक्तिधर बनशीधर | खूला |
| १२ | श्री.हांडे नितीन भालचंद्र | खूला |
| १३ | श्री.कांबळे दिलीप किसन | खूला |
| १४ | श्री. खेडकर सुधीर लक्ष्मण | खूला |
| १५ | श्री. तापकीर ज्ञानेश्वर वसंत | खूला |
| १६ | श्री. रानवडे दत्तात्रय गुलाब | खूला |
| १७ | श्री.भारती सोमनाथ कुंडलीक | खूला |
| १८ | श्री.निगडे सुरेश हरिश्चंद्र | खूला |

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४७, दि. २४/५/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. ११९**

संदर्भ :- १) मा. मुख्य सभा ठ.क्र.३७५, दि. २४/९/२००३

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ /न.अ./५०५, दि. ५/११/२००९ चे पत्र.

३) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २३३, दि. १०/२/२०१०.

---

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपाकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना माहे सप्टेंबर २००९ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर. ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्रं. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टी.डी. आर झोन | क्षे.चौ.मी. | डी.आर. सी. क्र | डी.आर.सी. दिल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | घोरपडी स.नं.७१, हि.नं.६ अ | ९.०० मी. कलम २०५ रस्ता व १२.०० मी.डी.पी.रस्ता | श्री. सुरेश चंद्रकांत कवडे | बी. | १५१७.७९ | ०००३८३८ ते ०००३८३९ | १४.९.२००९ |
| २ | कात्रज, स.नं.१० (पै) **(Land DRC )** | स्लम | श्री.जयंत हिरालाल शहा जयराज डेव्हलपर्स युनिट -३ | सी. | २५७.२० | ०००३८४८ | १४.९.२००९ |
| ३ | कात्रज स.क्र.१० (पै) (Brick work & R.C.C. ) | स्लम | श्री.जयंत हिरालाल शहा जयराज डेव्हलपर्स युनिट -३ | सी. | १०२०२.५० | ०००३८४७ | १४.९.२००९ |
| ४ | मे.कर्वेनगर स.नं.९ हि.नं.९ब + १० अ (पै) सि.स.नं.६६४ (पै) | हायस्कूल | श्री.शिवाजी धोंडीबा खाटपे तर्फे सौ.किर्ती दिनेश चंद्रात्रे | सी. | २४६१.३० | ०००३८२७ | १६.९.२००९ |
| ५ | म.कर्वेनगर स.नं.९ | हायस्कूल | श्री.विलास | सी. | ६१६.०६ | ०००३८२५ | १८.९.२००९ |

UnRegistered

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | हि.नं.१० ब (पार्ट) सि.एस.नं.६६५ (पार्ट) | | माधवराव जाधव तर्फे श्री. दिनेश चंद्रात्रे | | | | |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४८, दि. २४/५/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. १२०**

संदर्भ :– १) मा. मुख्य सभा ठ.क्र.३७५, दि. २४/९/२००३
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. म.आ./नअ/५८८,दि. ३०/११/२००९ चे पत्र.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २५५, दि. २४/२/२०१०.

---

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपाकडून विविध कारणामुंळे जागा संपादन करताना माहे ऑक्टोबर २००९ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर. ची. माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्रं. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टी.डी. आर. झोन | क्षेत्र चौ.मी. | डी.आर.सी. क्र | डी.आर.सी. दिल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्वेनगर, स. नं. ९ हि. नं. ८ब+ ९अ/ब(p), सि. टी. एस. नं. ६५७, ६५८, ६६१, ६६२, ६६३ (all parts) | हायस्कूल व प्लेग्राऊंड (पैकी) | श्री. रंजना चेतन श्रीधर बराटे, आशा शंकर बराटे, दिनेश बळवंत बराटे, बळवंत गणपत बराटे, नंदा गणपत बराटे, विष्णु सिदबा बराटे, शंकर सिदबा कुडले, अतुल, विनायक प्रभाकर खांदवे, उज्वला साहेबराव दरेकर | C | ३३५७.५४ | ०००३८२६ | १६/१०/२००९ |
| २ | कसबा पेठ, सि. स. नं. ८९२ | स्लम | शेख मोहम्मद फिरदोस शब्बीर | A | ३८३.३६ | ०००३८४६ | ३१/१०/२००९ |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ५२, दि. २४/५/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. १२१**

संदर्भ :– १) ला.आर्कि. दिपक देशचौगुले यांचा अर्ज वि.यो.क्र.डीपी/२४०९, दि. २४/१/०८
२) मा. संचालक नगर रचना महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र जा. क्र. वि. यो–पुणे/ पर्वती/ सि.स.नं.२२५९/टी.पी.व्ही–१/१८८७, दिनांक ३/१०/०८
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/११२२, दि. ३०/१२/२००८ चे पत्र
४) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २५६, दि. २४/२/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे पेठ पर्वती स.नं.७६ ते ८१ प्लॉट १२७ ते सि.स.क्र.२२५९ या मिळकतीमध्ये सन १९८७ चे विकास आराखडयामध्ये दर्शविलेल्या ग्रीन बिल्टचे क्षेत्र हे निवासी झोनमध्ये दर्शविणे कामी विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.६.६.२.१ (i व ii) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ५३, दि. २४/५/२०१० चा झाला आहे.)

UnRegistered

**विषय क्र. १२२**

संदर्भ :- १) मा.सुभाष जगताप व मा.निलेश निकम यांचे दि. १०/९/२००९ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठ.क्र. १२५, दि. २८/१०/२००९
३) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/न.अ./१०१४, दि.२३/३/२०१० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
४) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. १३, दि. २३/४/२०१०.

---

पुणे पेठ धनकवडी स.नं.९ चे उत्तरेस शिवराय सोसा. चे जागेमधून मा.अति.महा.आयुक्त (वि) यांच्या पत्रासोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार **'अ'** ते 'बी' पर्यंत ६.० मी. रूंदीचा पूर्व – पश्चिम रस्ता बी.पी.एम.सी.ॲक्ट कलम २०५ अन्वये आखणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे जून २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ३८, दि. २४/५/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. १२३**

संदर्भ :- १) मा. सुनिल झगडे व मा. राजेंद्र गोरडे यांचे दि. २८/५/१० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३२, दि. २८/५/२०१०.

---

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून

पुणे शहरात व नव्याने समाविष्ट गावांमधील गावठाणांमध्ये व दाट वस्तीमध्ये तसेच विरळ वस्तीमधील २५० चौ. मी. कमी क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींमध्ये पार्कींगवर इमारत बांधली गेल्यास संपूर्ण एफ.एस.आय. वापरायला अडचण होते. त्यामुळे पार्कींग मजला न ठेवता तळमजल्यावर बांधकाम केले जाते. अशा परीस्थितीत मिळकतीमध्ये पार्कींगसाठी पुरेशा जागा उपलब्ध होत नाही व पर्यायाने पार्कींग रस्त्यावर करण्यात येते. त्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होतो. हे टाळण्यासाठी गावठाण व दाट वस्तीमध्ये तसेच विरळ वस्तीमधील २५० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींमध्ये पार्कींग मजल्याची उंची न धरता इमारतीची उंची धरण्यात यावी व त्यासाठी आवश्यकता असल्यास मा. नगर अभियंता यांनी परिपत्रक काढावे अथवा एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## नाव समितीचे निवेदन

**विषय क्र. १२४**

पुणे मनपा हद्दीतील उद्याने, पूल, चौक इत्यादी सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावांची शिफारस करण्याबाबत झालेल्या मनपा ठ. क्र. ८, दि. २४/४/२००७ ला अनूसरुन दि. १७/५/२०१० रोजी दुपारी ३=५५ (तीन पंचावन्न) व ४=०० (चार) वाजताची दोन नाव समितीची निवेदने विचारासाठी.

## मा. सभासदांचा प्रस्ताव

**विषय क्र. १२५**

संदर्भ :- **मा. उज्वल केसकर व मा. बाबु वागसकर यांची (सूचना दि. १७/५/२०१०.)**
१) परिवहन उपक्रमाचे विषयपत्र क्रं.पीएमटी/टीसी/१७८१,दि.२६/६/२००३
२) मा.परिवहन उपक्रम समिती ठराव क्र१६१,दि.२४/७/२००३
३) परिवहन उपक्रमाचे विषयपत्र क्रं.पीएमटी/टीसी/२१९३,दि.१०/८/२००४
४) मा.परिवहन उपक्रम समिती ठराव क्र.२५३,दि.२५/११/२००४
५) मा.स्थायी समिती ठराव क्रं.१०२१,दि.१५/१२/२००४
६) मा.मुख्य सभा,मनपा पुणे ठराव क्र.२५०,दिनांक २२/१२/२००४
७) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३०२००३/१४९०/प्र.क्र.१२४/०३ नवि-२२ नगरविकास विभाग,दि.१६/१२/२००४
८) शासन गठीत समितीच्या अहवालाचे पत्र क्रं.पीसीएमसी/टीसी/१५४/२००५, दि.६/६/२००५
९) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३०२००३/१४९०/प्र.क्र.१२४/०३ नवि-२२ नगरविकास विभाग,दि.२/१/२००६

UnRegistered

१०) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३००३/१४९०/प्र.क्र.१२४/नवि-२२,दि.१३/४/२००६

११) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्रं.मआ-पीएमटी-२०६,दि.१९/५/२००६ चे पत्र.

१२) मा. सौ. राजलक्ष्मी भोसले, पक्षनेत्या, राष्ट्रवादी कॉंग्रेस ,मा. रमेश बोडके, पक्षनेता, शिवसेना, मा. अनिल शिरोळे, विरोधी पक्षनेता,यांची दि.२१/७/२००६ ची उपसूचना.

विषय :- पुणे परिवहन उपक्रम व पिंपरी-चिंचवड परिवहन उपक्रम यांचे एकत्रिकरणास मान्यता मिळणेबाबत.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे मनपा परिवहन उपक्रम व पिंपरी-चिंचवड परिवहन उपक्रम यांचे एकत्रिकरणास तसेच शासनाने नेमलेल्या संचालक मंडळाने दि.१६/१२/२००४ अन्वये गठित झालेल्या समितीने त्यांचे अहवालात केलेल्या शिफारशी नुसार खालील अटीवर मान्यता देण्यांत येत आहे.

१) शासनाने सूचित केल्याप्रमाणे इंडियन कंपनीज ॲक्टच्या तरतूदींखाली दोन्ही परिवहन उपक्रमाचे विलिनिकरण करुन नवीन कंपनी स्थापन करण्यास दोन्ही महापालिकाच्या भाग भांडवालच्या प्रमाणात समितीवर प्रतिनिधीचे प्रतिनिधित्व असावे.

२) परिवहन उपक्रम पुणे व परिवहन उपक्रम पिंपरी-चिंचवड यांच्या सध्या ताब्यात, वहिवाटीत किंवा त्यांचे नांवे असलेल्या सर्व मिळकती,स्थावर व जंगम मालमत्ता या निर्माण होणाऱ्या कंपनीमध्ये विलीन करणे आवश्यक राहणार आहे. त्याचप्रमाणे या दोन्ही परिवहन उपक्रमाचे त्यांचे -त्यांचे महानगरपालिका हद्दीत असलेल्या आरक्षणाच्या जागा ज्या दोन्ही संस्थांना अद्याप पर्यंत महानगरपालिकेच्या माध्यमातून संपादीत करुन प्राप्त झालेल्या नाहीत किंवा संपादनाची कार्यवाही प्रलंबीत आहे. अशा सर्व स्थावर मिळकती कंपनी निर्माण झाल्यावर देखील दोन्ही महानगरपालिकांनी सदरच्या आरक्षित स्थावर मिळकती उपलब्ध करुन देण्यास.

३) शासनाने आधीची देणी भाग विण्यासाठी वनटाईम ग्रॅन्ट द्यावी व विलीनिकरण झाल्यानंतर बजेट तयार करुन त्यात काही तोटा रहात असले तर त्यासाठी सुध्द ग्रॅन्ट द्यावी.

४) परिवहन उपक्रम पुणे हे पुणे शहरातील नागरिकांना महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार व मान्यतेनुसार ज्या सवलती देत आहे, त्या सवलतीस अनुसरुन पुणे परिवहन उपक्रमास जो तोटा सहन करावा लागत आहे,तो तोटा पुणे महानगरपालिकेने सवलती दिलेल्या वर्षाच्या पुढील आर्थिक वर्षामध्ये द्यावयाचा आहे. या सवलती प्रामुख्याने:-

१) विद्यार्थ्यांना देण्यात येणारी ५०% प्रवास सवलत.

२) अंध व स्वातंत्र्यसैनिक यांना देण्यात येणारी १००% प्रवास सवलत

३) १० वी पर्यंत शिक्षण घेणारे अपंग विद्यार्थ्यांना १००% सवलत

४) पुणे शहरातील ज्येष्ठ नागरिकांना मासिक सवलतीच्या पासेसमध्ये देण्यात येणारी १००/- रुपयांची सवलत.

५) महानगरपालिकेकडील कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वर्षभराचे संपूर्ण सवलतीचे पासेस.

वरीलप्रमाणे देण्यात येणाऱ्या सवलतींची होणारी रक्कम पुणे महानगरपालिकेने देणेआवश्यकआहे.

५) निर्माण होणाऱ्या कंपनीसाठी आवश्यक लागणारे भागभांडवल, त्याचप्रमाणे कंपनीचे आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कंपनी कायद्याखाली रजिस्ट्रेशन करताना, त्यावर होणारी स्टॅम्प ड्युटीचा खर्च महाराष्ट्र राज्य शासनाने माफ करावा व रजिस्ट्रेशन फी यांच्या सवलतीस शासनाने मान्यता न दिल्यास हा होणारा खर्च महानगरपालिकेने देण्यास.

६) विलिनीकरण झाल्यानंतर २ किंवा ३ वर्षानी कारभाराचा Review घेण्यासाठी समिती नेमावी व कारभाराचा अहवाल पाहून ठरवावे की पुणे मनपाने मदत द्यायची का नाही.

७) प्रत्येक प्रवाशांकडून तिकिटाद्वारे घेण्यात येणारा सरचार्ज पूर्व लक्षी प्रभावाने माफ (Amnesty) करावा.

८) कंपनीच्या मालमत्तांवर मनपाने (इतरांप्रमाणे ) मालमत्ताकर बसवावा.

९) पुणे मनपाची देणी वसूल करावीत.

१०) पी.सी.एम.सीचाही अशाच प्रकारे विचार व्हावा.

११) समितीमध्ये निवडून आलेल्या प्रतिनिधींनाच मतदानाचा अधिकार राहील, लोकप्रतिनिधींची संख्या वाढवावी.

Unregistered

१२) समितीमध्ये कामगार प्रतिनिधी घ्यावा, त्याला मतदानाचा अधिकार नसावा.

तसेच दोन्ही परिवहन उपक्रमांच्या विलिनिकरणाबाबत मान्यता देणेस व विलिनीकरणानंतर निर्माण होणाऱ्या कंपनीबाबत मा.महापालिका आयुक्त यांना मेमोरॅनडॅम ऑफ असोसिएशनस् त्याचप्रमाणे दाखल करावयाचे निरनिराळे कागदपत्रे/करार यावर स्वाक्षरी करण्यास व कंपनी कायद्याखाली विलिनिकरण करणेकामी महानगरपालिकेच्या वतीने सर्व अधिकार प्रदान करण्यास त्याचप्रमाणे वर नमूद केलेल्या सवलती व आर्थिक सहाय्य इ.देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सदर मनपा ठराव क्र.६३,दि. २१/७/२००६ चा फेरविचार करुन खालील प्रमाणे ठराव मान्य करण्यांत यावा.

संदर्भ :–

१) परिवहन उपक्रमाचे विषयपत्र क्रं.पीएमटी/टीसी/१७८१,दि.२६/६/२००३
२) मा.परिवहन उपक्रम समिती ठराव क्र१६१,दि.२४/७/२००३
३) परिवहन उपक्रमाचे विषयपत्र क्रं.पीएमटी/टीसी/२१९३,दि.१०/८/२००४
४) मा.परिवहन उपक्रम समिती ठराव क्र.२५३,दि.२५/११/२००४
५) मा.स्थायी समिती ठराव क्रं.१०२१,दि.१५/१२/२००४
६) मा.मुख्य सभा,मनपा पुणे ठराव क्र.२५०,दिनांक २२/१२/२००४
७) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३०२००३/१४९०/प्र.क्र.१२४/०३ नवि–२२ नगरविकास विभाग, दि.१६/१२/२००४
८) शासन गठीत समितीच्या अहवालाचे पत्र क्रं.पीसीएमसी/टीसी/१५४/२००५, दि.६/६/२००५
९) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३०२००३/१४९०/प्र.क्र.१२४/०३ नवि–२२ नगरविकास विभाग,दि.२/१/२००६
१०) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३००३/१४९०/प्र.क्र.१२४/नवि–२२,दि.१३/४/२००६
११) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्रं.मआ–पीएमटी–२०६,दि.१९/५/२००६ चे पत्र.
१२) मा.सौ.राजलक्ष्मी भोसले, पक्षनेत्या, राष्ट्रवादी कॉग्रेस ,मा.रमेश बोडके, पक्षनेता, शिवसेना, मा.अनिल शिरोळे, विरोधी पक्षनेता,यांची दि.२१/७/२००६ ची उपसूचना.

---

पुणे व पिंपपरी चिंचवड परिवहन उपक्रम हे सातत्याने तोट्यात चात असल्याने व स्पर्धात्मक बस वाहतूक होत असल्याने प्रवाशांना आवश्यक अशी बससेवा उपलब्ध होत नव्हती. तसेच निर्णय प्रक्रिया होण्यास महानगरपालिकेवर अवलंबून रहावे लागत असल्याने ही दिरंगाई दूर करण्यासाठी पी.एम.टी.व पी.सी.एम.टी. एकत्रिकरणाचा निर्णय घेण्यात आला होता.

दोन्ही उपक्रमांचे एकत्रिकरण शासन निर्णय दि. १९.४.२००७ अन्वये झालेले आहे. आज तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील निर्माण झालेली कंपनी कुठल्याही प्रकारचा सक्षम कारभार करु शकलेली नाही. चांगली सेवा देऊ शकलेली नाही. याबाबत खालील मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.

१. कंपनी निर्माण होऊन देखील आवश्यक तेवढ्या बसेस या ३ ते ४ वर्षामध्ये उपलब्ध करण्यास असमर्थ ठरलेली आहे.
२. दोन्ही संस्था एकत्रित होऊन देखील कंपनीची आर्थिक तूट कमी होण्याऐवजी वाढत चाललेली आहे. ही आर्थिक तूट केवळ दोन्ही महानगरपालिका शासन निर्णयास अनुसरुन आर्थिक अनुदान देत असल्याने कंपनी आर्थिक अडचणीतून मार्ग काढत आहे.
३. दोन्ही शहरातील प्रवाशांसाठी आवश्यक अशा मार्गाचे नियोजन व बसेसची उपलब्धता झाली नसल्याने सर्वसामान्य प्रवासी एकत्रिकरणाच्या निर्णयावर समाधानी नाहीत. कंपनी बस मार्ग व त्याचे नियोजन करण्यामध्ये असमर्थ ठरल्याचे दिसून येते.
४. आर्थिकदृष्ट्या दुर्बल होत चालेल्या संस्थेने अद्यापर्यंत कंपनीचे सेवकवर्गाची आस्थापना म्हणजेच सेवक संख्येचे प्रमाण तयार केलेले नाही. सध्या असलेल्या दोन्ही उपक्रमांचे आस्थापनेनुसारच सेवकांची पदे अस्तित्वात आहे. म्हणजेच कंपनी होऊन देखिल दोन्ही उपक्रमाची आस्थापना/पदे आज रोजी अस्तित्वात आलेली नाहीत. याठिकाणी देखिल कंपनी असमर्थ ठरलेली आहे.
५. सेवकवर्गावरील द्यावयाच्या कायदेशीर वेतन रकमा मोठ्या प्रमाणात थकलेल्या आहेत. तसेच निवृत्त सेवकांचे तोषदान इ. गेल्या दोन वर्षापासून दिलेले नाही. त्यामुळे सेवकांच्या वेतनाच्या रकमा मोठ्या प्रमाणात थकत चाललेल्या आहेत.
६. एकत्रिकरणाच्या पार्श्वभूमीवर २००६ पासून कोणत्याही कर्मचाऱ्यांना बढती, प्रमोशन अनुषंगीक लाभ

Unregistered

दिलेले नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी दिसून येत आहे. तसेच बढती, प्रमोशन न मिळताच सेवक निवृत्त होत आहेत. त्यामुळे त्यांना आर्थिक फायदा मिळालेला नाही. ही गंभीर बाब असून असमाधानी असलेले कर्मचारी कोणत्याही सहकार्याची भूमिका सध्या कामकाजात घेत नाहीत. कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष आहे.

७. कंपनी निर्माण झालेपासून कंपनीने प्रवासी कर व बालसंगोपन अधिभार इ. कोणतेही कर जे शासनाचे नियमानुसार भरणे आवश्यक होते ते आजपर्यंत भरलेले नाहीत व त्यामुळे या कराची थकबाकी जवळजवळ १०० कोटीपेक्षा जास्त झाली आहे. कंपनी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली नसल्याने थकबाकी वाढत चाललेली आहे.

८. कंपनी निर्माण करताना नवीन कायद्यास अनुसरुन निरनिराळ्या करांची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येते व त्यामुळे कंपनीस नवीन आर्थिक बोजा कंपनी कायद्यातील तरतूदीनुसार लागू झालेला आहे. त्यामुळे कंपनी निर्माण होऊन देखील आर्थिक कराचे दायित्व निर्माण झालेले आहे व हे देखील आर्थिक दायित्व आर्थिक दुर्बलमुळे भरण्यात आलेले नाही.

९. कंपनी निर्माण झालेनंतर स्वबळावर डेपोंची उभारणी, बसताफा वाढविणे, कर्मचाऱ्यांवरील योग्य नियंत्रण, मार्गाचे पुर्ननियोजन, प्रवाशांचे संख्येमध्ये वाढ, शहरातील वाहतूक कोंडी सोडविणे, प्रदूषण पातळी कमी करणे इ. सर्व बाबींवर मात करण्यात कंपनी असमर्थ व निष्क्रीय ठरलेली आहे.

१०. कंपनी प्रस्तापित झालेपासून कंपनीचे कारभाराकरिता ७ अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक नियुक्त झालेले आहे. कोणीही वरिष्ठ अधिकारी दीर्घकाळ काम करुन इच्छित नाही. तसेच याठिकाणी कायम स्वरुपी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यास शासन देखील असमर्थ ठरलेले आहे. गेल्या ९ महिन्यापासून पूर्ववेळ व्यवस्थापकीय संचालक यांची नियुक्ती नसल्याने दैनंदिन कारभार ढासळत चाललेला आहे.

११. त्याचप्रमाणे कंपनी प्रस्तापित झालेपासून शासन निर्णयानुसार कंपनीचे संचालक मंडळामध्ये संचालक, वित्त संचालक, परिवहन उपक्रम व संचालक, मानव संसाधन यांच्या नेमणूका करण्यास देखील शासन/कंपनी असमर्थ ठरलेली आहे.

१२. शासन निर्णयानुसार आर्थिक दायित्व दोन्ही महानगरपालिकांवर माहे मार्च २०१० अखेरपर्यंत आहे. हे आर्थिक दायित्व दोन्ही महानगरपालिकांकडून बंद केल्यावर ही कंपनी आर्थिक स्वबळावर दैनंदिन कारभार करु शकत नाही व कंपनीची दिवसेंदिवस परिस्थिती ढासळत चाललेली आहे. व याचा परिणाम जनमानसावर वाहतूकीचा प्रश्न निर्माण होऊन अधिक गंभीर होईल.

कंपनी स्थापन करताना जो उद्देश ठेवण्यात आलेला होता, तो उद्देश सफल झालेला नसून पुणे व पिंपरी चिंचवड शहराला योग्य ते बसमार्ग, बससंख्या देता आलेली नाही. तसेच कंपनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकलेली नाही. थकित असलेले पूर्वीचे उपक्रमाचे थकित रकमेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते, कर्मचाऱ्यांची आस्थापना, बढती देखील प्रश्न सोडविण्यात आलेले नाही. सेवकांचे वेतनाच्या थकित रकमामध्ये वाढ झालेली आहे. कर्मचाऱ्यामध्ये असंतोष आहे. एकंदरीतच वाहतूक विषयक कोणतेही प्रश्न कंपनी प्रस्तापित झालेपासून सोडविल्याचे दिसून येत नाही सबब महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्र.६३,दि.२१/७/२००६ चा फेरविचार करुन दोन्ही परिवहन उपक्रम दोन्ही महानगरपालिकांचे अधिपत्याखाली पूर्वीप्रमाणे अस्तित्वात आणणेस मान्यता देण्यात यावी.

## **संकिर्ण**

**विषय क्र. १२६**

माहे १९ मे २०१० ते १९ ऑगस्ट २०१० अखेर म.न.पा. मुख्य सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सदर कालावधीची रजा मान्य करणेबाबत मा. विकास दांगट यांचे दि. १९/५/२०१० चे पत्र.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :- ८/६/२०१०.

**सुनिल पारखी,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

Unregistered